महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४७ वे | दिनांक : २१/०५/२०२६ | वार : गुरूवार

## राज्यात १ महिना पुरेल एवढाच इंधन साठा : अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची माहिती



**मुंबई :** महाराष्ट्रातील अनेक पेट्रोल पंप इंधनाअभावी कोरडेठाक पडले आहेत. त्यातच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात केवळ १ महिना पुरेल एवढाच इंधन साठा असल्याचे स्पष्ट केले आहे. यामुळे मध्यपूर्वेतील स्थिती सुधारली नाही तर राज्याला मोठ्या इंधन टंचाईचा सामना करावा लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

मध्यपूर्वेत अमेरिका व इस्त्रायलने इराण विरोधात मोर्चेबांधणी केली आहे. सध्या या भागात तणावपूर्ण शांतता आहे. पण होर्मुझची सामुद्रधुणी बंद असल्यामुळे येथून होणारी इंधनाची वाहतूक ठप्प पडली आहे. परिणामी, पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे भारतात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर इंधनासाठी लोकांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी हाणामारीचेही प्रकार घडलेत. या प्रकरणी विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली असताना मंत्री छगन भुजबळ यांनी उपलब्ध साठ्याची उपरोक्त माहिती दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, सरकारकडे सध्या केवळ १ महिना पुरेल एवढाच पेट्रोल - डिझेलचा साठा उपलब्ध आहे. पेट्रोल - डिझेलची चिंता असली तरी राज्याकडे केरोसिनचा (रॉकेल) मुबलक साठा आहे. पण केरोसीन वाटपाची जी साखळी होती, ती आता पूर्णपणे तुटली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी व वाटप सुरळीत करण्यासाठी काही विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेषतः ही पुरवठा साखळी पूर्ववत करण्यासाठी आता केरोसीन वाटपाची विनामूल्य परवानगी दिली जाईल.

भुजबळ म्हणाले, इंधन टंचाईचा प्रश्न हा केवळ मुंबई, महाराष्ट्र किंवा भारतापुरता मर्यादित नाही. हा एक जागतिक प्रश्न बनला आहे. इराण, अमेरिका व इतर देशांमध्ये सुरू असलेला अंतर्गत वाद व राजकीय घडामोडींमुळे जागतिक इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्याचा फटका युरोपपासून जपानपर्यंत व अगदी अमेरिकेसारख्या महासत्तेलाही बसला आहे. तिथेही पेट्रोल - डिझेलचे भाव गगनाला भिडलेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या स्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. इंधनाची आवक सुरुळीत ठेवण्यासाठी ते अनेक नव्या देशांशी संपर्क साधून चर्चा करत आहेत. जागतिक इंधन संकट मोठे आहे. त्यामुळे आपल्यालाही थोडी अडचण सहन करावी लागेल. पण इतर देशांच्या तुलनेत सध्यातरी भारताची परिस्थिती अत्यंत चांगली व नियंत्रणात आहे.

छगन भुजबळ यांनी यावेळी पीएनजी गॅस पाईपलाईन झालेल्या भागातील नागरिकांना ३० जूनपूर्वी जोडणी करण्याचा अर्ज करणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट केले. ज्या - ज्या भागात पीएनजी गॅस पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे किंवा कंपन्या पाईपलाईन जोडणीचे काम करत आहेत, त्या भागातील नागरिकांनी ३० जूनपूर्वी जोडणीसाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यांनी या मुदतीत अर्ज केला नाही, तर त्यांचे एलपीजी सिलिंडर बंद केले जाईल, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी छगन भुजबळांच्या विधानावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खुलासाही मागितला आहे. त्या म्हणाल्या, राज्यभरात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईमुळे पंपावर रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी हिंसक घटना घडल्याचे देखील वृत्त आहे. राज्यात सर्वत्र इंधनटंचाईमुळे जनता त्रस्त असताना शासनाने केवळ एक महिना पुरेल एवढेच इंधन असल्याचे स्पष्ट केले आहे.

या एक महिन्यानंतर काय परिस्थिती असणार आहे ? ही परिस्थिती कायम राहील की इंधन उपलब्ध करुन दिले जाईल याबाबत काहीच स्पष्टता येत नाही. जनतेमध्ये संभ्रमाचे आणि चिंतेचे वातावरण आहे, नेमकं काय सुरु आहे याबाबत स्वतः मुख्यमंत्री महोदयांनी पुढे येऊन खुलासा केला पाहिजे.

## मोदींनी समुद्रात उडी मारायला सांगितली तरी आम्ही मारू:आमदार प्रमोद जठार यांचे विधान

**मुंबई :** मोदीजी कोणत्याही रात्री काहीही बंद करू शकतात, असे म्हटले आहे. तसेच मोदींनी समुद्रात उडी मारायला सांगितली तरी आम्ही मारू, असे विधान भाजप नेते व आमदार प्रमोद जठार यांनी केले आहे. देशातील सद्यपरिस्थितीवरून विरोधकांनी केंद्र सरकारसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. त्यात भाजप नेत्यांकडून प्रत्युत्तर दिले जात आहे. अशातच आता प्रमोद जठार यांनी केलेल्या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

प्रमोद जठार कार्यकर्त्यांना उद्देशून बोलताना म्हणाले, आमचा नेता मजबूत आहे. देशातील सरकार मजबूत आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी रहा आणि ते जे सांगतील ते ऐका, असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच मोदीजी कोणत्याही रात्री काहीही बंद करू शकतात. तसेच मोदींनी समुद्रात जरी उडी मारायला सांगितली तरी आम्ही मारू, असे विधान त्यांनी केले आहे. याचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे.

प्रमोद जठार यांनी केलेल्या विधानाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. तसेच सोशल मीडियावर देखील त्यांच्या विधानावर विविध प्रतिक्रिया उमटत असून विरोधकांनी यावरून टोलेबाजी सुरू केली आहे.

कोकणातील भाजपचा एक प्रमुख चेहरा असलेले आणि पक्षात सातत्याने सक्रिय असणारे नेते प्रमोद जठार यांची नुकतीच भाजपकडून विधान परिषदेवर निवड झाली आहे. यापूर्वी, २००९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली मतदारसंघातून भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती आणि काँग्रेसचे उमेदवार रवींद्र फाटक यांचा अवघ्या ३२ मतांनी निसटता पराभव करून लक्षवेधी विजय मिळवला होता.

त्यानंतर भाजपचे सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिलेले जठार सध्या महाराष्ट्र प्रदेश भाजपचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय पक्ष संघटनेने त्यांच्याकडे रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली असून, कोकणातील नाणार रिफायनरीसारख्या औद्योगिक प्रकल्पांबाबतही त्यांनी यापूर्वी आपली अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली आहे.

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा विषय संपलाय - शशिकांत शिंदेंचे मोठे विधान



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मात्र आमदार रोहित पवार यांनी पाथ फिरवल्याचे पाहायला मिळाले. शरद पवारांनी अजित पवार गटातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची काही दिवसांपूर्वी स्तुती केली होती, त्यामुळे रोहित पवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यात त्यांनी या बैठकीला दांडी मारल्याने नाराजीच्या चर्चेला उधाण आले आहे. तर पक्षाचे नेते शशिकांत शिंदे यांनी बैठकीबाबत पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले, फार मोठ्या उमेदीने पक्ष पुढे नेण्यासाठी सर्वांचा सहभाग असावा, त्यात खासदार असतील, आमदार असतील, ज्यांनी निवडणुका लढवल्या आहेत त्या सगळ्यांना बरोबर घेऊन आणि सगळ्यांनी वेळ देऊन पक्षात पूर्णपणे महाराष्ट्रात शरद पवारांच्या नेतृत्वाखाली सक्षम विरोधी पक्ष म्हणून आम्ही उभा करण्याच्या संदर्भात बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत सर्वच कार्यकर्ते, पदाधिकारी, आमदार तसेच खासदारांनी आपापली भूमिका मांडली आहे. तसेच हे आधी स्पष्ट करती की विलीनीकरणाचा हा विषय संपलेला आहे. यापुढे विलीनीकरणाबाबत कुठलीही चर्चा होणार नाही. आम्ही सक्षमपणे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष म्हणून हा पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आमच्याकडे एक नेता म्हणून जो चेहरा आहे, तो घेऊन आम्ही महाराष्ट्रात जाणार आहोत.

आमदार रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना खंत व्यक्त केली होती की आमच्या पक्षातील नेते काम करत नाहीत, यावर प्रश्न विचारला असता शशिकांत शिंदे म्हणाले, आज मी तुम्हाला पक्षाचा अध्यक्ष म्हणून सांगतो, त्यांनी माध्यमांच्या बाहेर काय सांगितले आहे ते मला माहीत नाही. पण मी एक सांगतो आम्ही पक्षाच्या शिस्तीतून आम्ही व्यवस्थित एकत्र काम करू. त्यांच्या काही खंत असतील त्या मी दूर करून भविशेत आक्रमकपणे आंदोलन करणार आहोत. आम्ही एक शिबिर देखील आयोजित करणार आहोत. आज नीट परीक्षेचा प्रश्न आहे, इंधन दरवाढ आहे, महागाई आहे, या सगळ्या गोष्टींचा विचार करून पक्ष मजबूत करण्यात येणार आहे आणि पक्षाच्या चौकटीमधूनच पुढे जाण्याचा प्रयत्न करणार आहोत.

शशिकांत शिंदे म्हणाले, १५ ऑगस्ट नंतर आम्ही संयुक्तपणे काँग्रेस असेल, शिवसेना असेल आणि राष्ट्रवादी आम्ही महाराष्ट्रात राज्यव्यापी दौरे करणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यात संघटन मजबूत करणार आहोत. जनतेच्या प्रश्नासाठी आम्ही उतरणार आहोत. कार्यकर्ता आहे तिथे आहे, जनता आमच्या पाठीशी आहे. जनतेच्या माध्यमातून उठाव करून सरकारच्या विरोधात आम्ही आंदोलन करणार आहोत, अशी माहिती शिंदे यांनी दिली आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ मे २०२६

## इयत्ता पाचवीची एक विद्यार्थीनी व इयत्ता आठवीचे तेरा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**गोषेगाव** : मानव विकास व पूर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांच्यामार्फत घेतली जाणारीपूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी मधून आराध्या दत्तू सुलताने, इयत्ता आठवी मधून अनुष्का गजानन देखणे, भाग्यश्री नंदू भोकरे, दीक्षा देविदास जाधव, दिव्या ज्ञानेश्वर भोकरे, गौरी गजानन मोहिते, मयुरी कैलास सोरमारे, मयुरी भाऊसाहेब घोडे, प्रणाली संदीप खरात, प्रतीक किशोर फुके, प्रेम राजेंद्र मोहिते, समीक्षा दिगंबर श्रीखंडे, शिवानी गणेश भोकरे, श्रद्धा रामकिसन मोहिते, शिष्यवृत्ती निकालास पात्र ठरले.

निकालास पात्र विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर सर तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बीड जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न



**बीड (भगवंत पाळवदे)** : जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठा मुबलक आणि गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने चोख नियोजन करावे. तसेच जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्र.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक दादाराव जाधव यांच्यासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या तसेच विशिष्ट कंपनीचे उत्पादन घेण्याची शेतकऱ्यांना सक्ती करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी. कृषी विभागाच्या भरारी पथकांनी वेळोवेळी कृषी केंद्रांना भेट देऊन तपासणी करावी, तसेच टोल फ्री क्रमांकावर प्राप्त तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणांची विक्री रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. कृषी केंद्र दुकानदारांनी बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांवर कोणतीही अट लादू नये, अन्यथा संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यात गायरान जमिनीसह इतर ठिकाणी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यास सांगितले. तसेच पोकरा योजनेअंतर्गत रेशीम उत्पादनासाठी क्षेत्रवाढ करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पीक कर्ज वितरणाबाबतही त्यांनी बँक अधिकाऱ्यांना सूचना देत जिल्ह्यात 100 टक्के पीक कर्ज उद्दिष्ट पूर्ण करण्यावर भर दिला. कर्ज वितरणात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित केली जाईल, असे ही त्यांनी सांगितले.सुरुवातीस प्रास्ताविकात आत्माचे प्रकल्प संचालक तथा प्र. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी खरीप हंगाम जून 2026 पासून सुरू होत असल्याची माहिती दिली. यात बीड जिल्ह्यात 10.68 लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्र असून सरासरी 8.85 लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप लागवड केली जाते. असे सांगून त्यांनी बि-बियाणांसह खत साठ्याची माहिती, पिक विमा, पिक कर्ज, मृदा तपासणी, शेतकरी अनुदान वाटप याची संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

तसेच बदलत्या हवामानाशी सुसंगत शेतीसाठी पोकरा योजनेतून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू असून उत्पादनवाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## भौतिक सुविधां पाहणीसाठी कन्नड केंद्रातील शाळांना जि.प. पथकाची भेट




**कन्नड (अरुण थोरात)** : शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने दि. 18 ते 30 मे दरम्यान विशेष शाळा तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत दि. 19 व 20 मे रोजी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथील सचिन शिंदे (अधिक्षक वर्ग-2), नितीन वाणी (वरिष्ठ सहाय्यक) तसेच प्रकाश राठोड (समूह साधन केंद्र समन्वयक, वेरूळ) यांच्या संयुक्त पथकाने कन्नड केंद्रातील सर्व शाळांना भेट देऊन भौतिक सुविधांची पाहणी केली.या तपासणीदरम्यान शाळांमधील वर्गखोल्यांची संख्या व स्थिती, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय व्यवस्था, कंपाऊंड वॉल, किचन शेड, हँडवॉश स्टेशन, प्रत्येक वर्गातील ट्युबलाईट, ब्लॅकबोर्ड, व्हाईटबोर्ड, डिजिटल बोर्ड, अग्निशमन सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, चाईल्ड हेल्पलाईन व प्रतिबंध हेल्पलाईन क्रमांकाचे फलक, तंबाखूमुक्त परिसर, स्वच्छता फलक, स्वयंपाकगृह स्वच्छता व धान्य साठवण यांसह विविध बाबींची सविस्तर पाहणी करण्यात आली. पथकाने संबंधित बाबींवर अभिप्राय नोंदवून आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शिक्षक समितीचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख सतीश कोळी यांनी कन्नड केंद्रातील काही शाळांमध्ये तुटलेले स्लॅब, मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांची आवश्यकता, अपूर्ण कंपाउंड वॉल, वीजपुरवठा, पंखे आदी मूलभूत सुविधा शाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. दरम्यान, हिवरखेडा गौ. शाळेतील प्रत्येक वर्गातील सीसीटीव्ही व्यवस्था, आकर्षक रंगरंगोटी, बोलक्या भिंती, डेन्स फॉरेस्ट उपक्रम तसेच संरक्षक भिंतीची पाहणी करून तपासणी पथकाने समाधान व्यक्त केले. या प्रसंगी केंद्रातील प्रशालेचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड, केंद्रशाळेचे मुख्याध्यापक सतीश कोळी, मधूकर पवार (मंक्रणपूर), रावसाहेब आहिरे (रेलतांडा), शिवाजी बगाड (रेल), सुनिता निकम/सोमवंशी (साखर कारखाना), अविनाश पाखले (गराडा), दिलीप मगर (ब्राह्मणी), योगेश गायकवाड (गारगोटी तांडा), कमल सोनवणे (कोळसवाडी), साजेदाबानो शेख (कन्नड नं 2 उर्दू), विनय जोशी व दिनेश दाभाडे (हिवरखेडा गौ.) आदी शिक्षक उपस्थित होते.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ मे २०२६


## शिक्षणाच्या बाजारात हरवलेला विद्यार्थी

देशभरात पुन्हा एकदा नीट परीक्षेच्या पेपरफोडीमुळे चर्चेला उधाण आले आहे. अनेकांना अटक होत आहे. कदाचित पेपरफोडीचा मोठा राजकीय सूत्रधार सापडणे बाकीच आहे. एक मात्र नक्की आहे की, लाखो विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील विश्वास पुन्हा हादरला. पालक हवालदिल झाले आहेत. गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया, प्रवेशपूर्व परीक्षा आणि पात्रता चाचण्यांमधील पेपरफोडी, गैरव्यवहार, दलाली आणि संघटित भ्रष्टाचार इतक्या मोठ्या प्रमाणावर समोर आले आहेत की आता त्या घटना अपवाद राहिलेल्या नाहीत; उलट त्या व्यवस्थेच्या स्वभावाचा भाग बनल्या आहेत. पण या सगळ्या चर्चेत आपण बहुतेक वेळा काही दलाल, काही आरोपी, काही टोळ्या किंवा तांत्रिक सुरक्षेतील त्रुटी यांपुरतेच प्रश्न मर्यादित ठेवतो. प्रत्यक्षात प्रश्न अधिक खोल आहे. प्रश्न असा आहे की देशातील शिक्षणव्यवस्था नेमकी कोणासाठी उभी आहे? ज्ञानासाठी की बाजारासाठी? विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी की शिक्षणसम्राट, कोचिंग लॉबी आणि सत्ताधारी हितसंबंधांच्या नफ्यासाठी?आज शिक्षण हा सार्वजनिक हक्क कमी आणि आर्थिक व्यवहार अधिक झाला आहे. शिक्षण म्हणजे समाजपरिवर्तनाचे साधन नसून गुंतवणुकीवर परतावा देणारा उद्योग बनला आहे. त्यामुळेच पेपरफोडी ही केवळ गुन्हेगारी घटना नसून शिक्षणाच्या व्यापारीकरण, कार्पोरेटीकरणातून जन्माला आलेली सामाजिक दुर्घटना आहे. एक काळ असा होता की शाळा आणि महाविद्यालये ही ज्ञाननिर्मितीची केंद्रे मानली जात होती. शिक्षक हा समाजाचा बौद्धिक मार्गदर्शक होता. विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास शाळा-महाविद्यालयांवर आणि शिक्षकांच्या अध्यापनावर होता. पण गेल्या दोन दशकांत परिस्थिती इतक्या वेगाने बदलली की आज अनेक ठिकाणी महाविद्यालये केवळ परीक्षा फॉर्म भरण्याची केंद्रे उरली आहेत आणि प्रत्यक्ष शिक्षण कोचिंग क्लासेसमध्ये दिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे शैक्षणिक निर्णय आता शाळा किंवा महाविद्यालये घेत नाहीत; ते कोचिंग उद्योग घेत आहेत.याचा सर्वात मोठा फटका प्रामाणिक शिक्षणसंस्थांना बसला. अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी नियमित वर्गात यावे, शिक्षण प्रक्रियेत सहभागी व्हावे, असा आग्रह धरला; पण त्याच महाविद्यालयांच्या तुकड्या उडाल्या. ग्रामीण भागात दहावी-बारावी परीक्षांमधील सामूहिक कॉपीच्या प्रवृत्तीमुळे आणि कोचिंगकेंद्री संस्कृतीमुळे अनेक महाविद्यालये ओस पडली. शिक्षक सरप्लस झाले. ज्ञान देणारी शिक्षणसंस्था कमकुवत होत गेली आणि दुसरीकडे कोचिंग उद्योग हजारो कोटींच्या साम्राज्यात बदलला. शिक्षणमहर्षी किंवा शिक्षणसम्राट नव्हे, तर शिक्षणमाफिया तयार झाले आहेत. हे चित्र योगायोगाने निर्माण झालेले नाही. शिक्षणव्यवस्थेचे धोरणात्मक दुर्बलीकरण आणि कोचिंग उद्योगाला मिळालेला राजकीय-सामाजिक आश्रय या दोन्ही गोष्टी एकत्र घडल्या आहेत. आज देशातील शाळा-महाविद्यालये अति-सरकारीकरण आणि अति-खासगीकरणाने ग्रासली आहेत. बहुतांश शिक्षणसंस्था थेट किंवा अप्रत्यक्षपणे राजकारण्यांच्या ताब्यात आहेत. अनेक कोचिंग क्लासेसवाल्यांनी स्वतः शिक्षणसंस्था उघडल्या आहेत. अनेक कोचिंग साखळ्या प्रभावशाली आर्थिक आणि राजकीय गटांशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षणातील प्रत्येक संकटातून कुणाचा तरी व्यवसाय उभा राहतो. शाळा-महाविद्यालयातून शिक्षकांना अशैक्षणिक कामे, भौतिक व पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षकांची कमतरता, संस्थाचालकांचा वाढता हस्तक्षेप आणि त्यातून शिक्षकांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण यामुळे सरकारी व खासगी अनुदानित शाळ-महाविद्यालये कमकुवत होतात किंवा केली जातात. त्यामुळे खासगी शाळांचा बाजार आपोआप फोफावतो; या शाळा-महाविद्यालयांना कुठलेही निर्बंध नाहीत. महाविद्यालयांत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी निवडलेल्या सर्व विषयांचे अध्यापन, प्रात्यक्षिक कार्य व इतर सांस्कृतिक क्रीडाविषयक पुरक कार्यक्रम होत असतात. तसेच बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने वर्षभर वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक (Descriptive) प्रश्नांवर आधारित मूल्यमापनाच्या परीक्षा घेतल्या जातात. मात्र कोचिंग क्लासेसमध्ये प्रात्यक्षिक कार्य नसते, संबंधित परीक्षेव्यतिरिक्त अन्य विषयांचे अध्यापन नसते, इतर पुरक उपक्रम नसतात. नीटच्या, सीईटीच्या, जेईईसारख्या पूर्वपरीक्षा पध्दती ही वर्णनात्मक (Descriptive) प्रश्न स्वरूपाची नसून ती वस्तुनिष्ठ आणि मोठ्या प्रमाणात पाठांतरावर आधारलेल्या स्वरूपाची आहे. त्यामुळे कोचिंग क्लासेस फोफावतात; स्पर्धा परीक्षा अधिक अवघड आणि केंद्रीकृत झाल्या की टेस्ट सिरीज, डिजिटल कोर्सेस आणि प्रशिक्षण बाजार तेजीत येतो. इथे विद्यार्थ्यांत तर्क, विवेक, चिकित्सकता व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होत नाही. बरेचदा विद्यार्थ्यांचे करिअर घडेल पण तो मानवतावादी दृष्टीने घडत नाही. अंधश्रद्ध, गुलाम मानसिकता, असंवेदनशीलता किंवा स्वार्थी दृष्टीकोन यांची घडण होते.या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठे नुकसान होते ते ग्रामीण, बहूजन, कष्टकरी आणि निम्नमध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे. कारण शिक्षणातील स्पर्धा आता बुद्धिमत्तेची उरलेली नाही; ती आर्थिक क्षमतेची बनली आहे. ज्यांच्या पालकांकडे लाखो रुपये खर्च करण्याची ताकद आहे, त्यांना दर्जेदार कोचिंग, निवासी प्रशिक्षण, डिजिटल सुविधा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि परीक्षा रणनीती उपलब्ध होते. दुसरीकडे एखादा ग्रामीण विद्यार्थी अपुऱ्या शिक्षकांमध्ये, मर्यादित साधनांमध्ये आणि आर्थिक तणावात शिक्षण घेत असतो. मग या दोघांनाही एकाच परीक्षेत बसवून "मेरिट"चा दावा केला जातो. प्रत्यक्षात ही समान संधी नसून संरचनात्मक विषमता आहे. बहुस्तरीय शिक्षणव्यवस्था म्हणजे आधुनिक स्वरूपातील ज्ञानवंचना आहे. एक शिक्षण श्रीमंतांसाठी, एक मध्यमवर्गासाठी आणि उरलेले गरीबांसाठी तसेच जातवार आणि धर्माधारित शिक्षणपद्धतींची विभागणी उघडपणे दिसू लागली आहे. इंग्रजी माध्यम विरुद्ध स्थानिक माध्यम, खासगी विरुद्ध सरकारी, कोचिंगयुक्त विरुद्ध कोचिंगविरहित अशा अनेक भिंती शिक्षणात उभ्या राहिल्या आहेत. तसेच शिक्षणाच्या आशयाचा मुद्दा तर फारच अवघड करुन ठेवलाय... तो सर्व प्रकारे विषमतावादी आहे. सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध कसे टिकून राहतील, याच दृष्टीने शिक्षणरचना उभी करण्यात आली आहे. हीच आधुनिक मनुवादी रचना आहे.महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे साधन मानले होते. शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया आणि शोषित-पिडित समाज शिक्षित झाला नाही तर समता निर्माण होणार नाही, याची त्यांना स्पष्ट जाणीव होती. म्हणूनच त्यांनी शिक्षणाचा प्रश्न हा केवळ शाळांचा प्रश्न न मानता सामाजिक न्यायाचा प्रश्न मानला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" हा संदेश देताना शिक्षणाला परिवर्तनाची क्रांतिकारी शक्ती मानले. त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नव्हते; ते स्वाभिमान, विवेक आणि लोकशाहीची पायाभरणी करणारे माध्यम होते. पण आजची शिक्षणव्यवस्था नेमकी उलट दिशेने जाताना दिसते. शिक्षण माणूस घडवण्याऐवजी बाजारासाठी मनुष्यबळ तयार करत आहे. विचार करण्याऐवजी पाठांतर शिकवत आहे. विवेक निर्माण करण्याऐवजी अंधस्पर्धा निर्माण करत आहे. समाजभान वाढवण्याऐवजी व्यक्तिकेंद्री यशाचे स्वप्न विकत आहे.पेपरफोडी ही त्यामुळे काही अचानक घडलेली दुर्घटना नाही. जिथे शिक्षणाचे उद्दिष्ट ज्ञान नसून कोणत्याही मार्गाने यश मिळवणे बनते, तिथे गैरव्यवहार अपरिहार्य होतात. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य काही तासांच्या परीक्षेवर अवलंबून ठेवले जाते आणि त्या परीक्षेत यश म्हणजे प्रतिष्ठा, नोकरी, पैसा आणि सामाजिक सुरक्षितता मानली जाते. अशा परिस्थितीत पेपरफोडीचे रॅकेट उभे राहणे ही व्यवस्थेचीच उपज आहे. कारण जिथे शिक्षण बाजारात बदलते, तिथे नैतिकता सर्वप्रथम मरते. आज कोटा आणि इतर कोचिंग केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. नैराश्य, अपयशाची भीती, सामाजिक दडपण आणि आर्थिक ताण यांच्या ओझ्याखाली विद्यार्थी जगत आहेत. ही केवळ वैयक्तिक मानसिक आरोग्याची समस्या नाही; ही संपूर्ण शिक्षणव्यवस्थेची सामूहिक शोकांतिका आहे.म्हणून उपाय केवळ कठोर कायदे, डिजिटल सुरक्षा किंवा आरोपींना अटक यात नाही. प्रश्न व्यवस्थेच्या मूलभूत पुनर्रचनेचा आहे. शिक्षणाला बाजारातून बाहेर काढावे लागेल. सरकारी व खासगी अनुदानित शाळा-महाविद्यालये सक्षम करावी लागतील. समान, मोफत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था उभी करावी लागेल. कोचिंग संस्कृतीवर कठोर नियंत्रण आणावे लागेल. परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, बहुआयामी आणि मानवी करावी लागेल. शिक्षणाचा उद्देश फक्त डॉक्टर, इंजिनिअर किंवा अधिकारी निर्माण करणे नसून विवेकशील, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले, समतावादी आणि जबाबदार नागरिक घडवणे हा असला पाहिजे. तसेच शिक्षणातील जातीभेद, वर्गभेद, लिंगभेद नष्ट करणे असला पाहिजे. फुले-आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन हाच होता.आज गरज आहे ती आत्मपरीक्षणाची. पालकांनी विचार करावा की आपण मुलांना शिक्षण देतो आहोत की स्पर्धेच्या कारखान्यात ढकलतो आहोत. शिक्षकांनी विचार करावा की शिक्षणाला बाजाराच्या हाती सोडून आपण आपली सामाजिक भूमिका गमावत तर नाही ना. आणि समाजाने विचार करावा की समान शिक्षणव्यवस्थेशिवाय लोकशाही टिकू शकते का. कारण शिक्षणातील विषमता शेवटी समाजातील विषमता अधिक मजबूत करते. म्हणून हा लढा केवळ पेपरफोडीविरोधात नाही; हा लढा शिक्षणाच्या व्यापारीकरणाविरोधात आहे. हा लढा ज्ञानाच्या खासगीकरणाविरोधात आहे. आणि हा लढा फुले-आंबेडकरांच्या समताधिष्ठित शिक्षणस्वप्नाच्या पुनर्स्थापनेसाठी आहे. अन्यथा उद्या आपल्या देशात विद्यापीठे असतील, पदव्या असतील, परीक्षा असतील, रँकिंग असतील; पण विचार करणारा विद्यार्थी आणि प्रश्न विचारणारा समाज उरणार नाही.

**प्रभाकर गायकवाड**
**शिक्षणविषयाचे अभ्यासक व कार्यकर्ते**

## माणसा तू टाळू नको!

माणसा दगडात देव,
आता तू शोधू नकोस.
अंधश्रद्धेच्या मागे,
उगीच धावू नकोस. १

अंधश्रद्धेचे विचार,
आता पाळू नको.
विज्ञानाची क्रांती,
माणसा तू टाळू नको. २

विज्ञानाचे विचार
तू जाणून घ्यावे.
कर्मकांड अंधश्रद्धा
कायम जाळून द्यावे. ३

अंधश्रद्धा कर्मकांड
सारेच सोडून यावे.
विज्ञान विचार सदा
आता पेरीत जावे. ४

अंधश्रद्धेचे विचार
विचारांना मारतील.
विज्ञान विचार जगाला
सदा सर्वदा तारतील. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## रखरखत्या उन्हात

रखरखत्या उन्हात
माय तुडविते वाट
पुसे घामाचा पाट
फाटक्या पदरांनी

रखरखत्या उन्हात
माय आयुष्य जाळते
का स्वतःला छळते
स्वप्न रंगवत

रखरखत्या उन्हात
आयुष झाले वाळवंट
दाबे वेदनेचा कंठ
आमच्याकडे पाहूनी

रखरखत्या उन्हात
अंगी नाही बळ
काटे गोटे करी छळ
अनवाणी पायांना



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ मे २०२६


# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज : काळाची गरज

२१ मे हा दिवस भारतामध्ये ‘दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन’ म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी घटनेची आठवण करून देणारा आहे. भारताचे माजी पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस ‘दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन’ म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसून येते.मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हे देखील हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे.भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. पंजाबमधील अतिरेकी चळवळी, जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया, नक्षलवाद आणि महानगरांमधील बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांनी देश हादरून गेला. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला अशा घटनांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, सैनिक आणि पोलिस शहीद झाले. या घटनांमुळे समाजामध्ये भीती, असुरक्षितता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.दहशतवादाची कारणे अनेक प्रकारची आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना चुकीच्या मार्गाला लावतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे युवकांमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.हिंसाचाराचा परिणाम अत्यंत भयावह असतो. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निरपराध लोकांचे प्राण जातात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि हजारो लोक मानसिक आघात सहन करतात. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवणे होय. लहान मुले अनाथ होतात, महिलांचे संसार उद्ध्वस्त होतात आणि वृद्ध व्यक्ती आधारविना राहतात. हिंसेमुळे समाजामध्ये भीती आणि अविश्वास वाढतो. लोक सार्वजनिक ठिकाणी जाण्यास घाबरतात. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, रेल्वे स्थानके आणि धार्मिक स्थळे असुरक्षित वाटू लागतात. दहशतवादी घटनांचा मानसिक परिणामही गंभीर असतो. अनेक लोकांना दीर्घकाळ तणाव, नैराश्य आणि भीतीचा सामना करावा लागतो.दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे.आजच्या डिजिटल युगात सायबर दहशतवाद हे नवे संकट बनले आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था आणि संप्रेषण प्रणालीवर हल्ले केले जाऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणे आणि समाजात अस्थिरता निर्माण करणे हे प्रकार वाढले आहेत. काही वेळा खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण संदेशांमुळे दंगली आणि हिंसाचार भडकतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती तपासल्याशिवाय पुढे पाठवू नये. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळाची गरज बनली आहे.दहशतवाद आणि हिंसाचार रोखण्यासाठी शिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम ठरू शकते. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच शांतता, सहिष्णुता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. शिक्षणामुळे विवेकशीलता विकसित होते आणि युवक चुकीच्या प्रवृत्तीं पासून दूर राहतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, मानवता आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विविध धर्म, संस्कृती आणि विचारांचा आदर करण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे.भारत देशात महात्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला अहिंसेचा महान संदेश दिला. सत्य, प्रेम आणि शांततेच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. गांधीजींच्या मते हिंसा तात्पुरता विजय मिळवून देऊ शकते; परंतु दीर्घकालीन शांतता आणि मानवतेचे रक्षण केवळ अहिंसेतूनच शक्य आहे. आजच्या काळात गांधीजींचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्यास द्वेष वाढतो; परंतु संवाद, सहकार्य आणि समजूतदारपणातून समाजात सलोखा निर्माण होतो.कुटुंब व्यवस्थेची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलांमध्ये नैतिक मूल्ये, सहनशीलता, परस्पर आदर आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य कुटुंबातूनच सुरू होते. पालकांनी मुलांच्या वर्तनाकडे लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आज अनेक युवक सोशल मीडियाच्या प्रभावाखाली येतात. चुकीच्या विचारसरणीचा प्रभाव पडू नये यासाठी कुटुंबातील वातावरण सकारात्मक असणे गरजेचे आहे. युवकांना योग्य दिशा मिळाली तर ते राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतात.माध्यमांची जबाबदारी देखील अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडिया यांच्या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करता येते. मात्र, काही वेळा सनसनाटी वृत्तांकनामुळे समाजात भीती आणि तणाव वाढतो. त्यामुळे माध्यमांनी जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने बातम्या सादर करणे आवश्यक आहे. समाजात शांतता, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचविणे ही माध्यमांची सामाजिक जबाबदारी आहे.भारत सरकार आणि विविध सुरक्षा यंत्रणा दहशतवाद रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. सैन्यदल, पोलिस, गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा देशाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. दहशतवादी कारवायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही विविध देश एकत्र येऊन दहशतवादाविरोधात सहकार्य करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने दहशतवादाला जागतिक शांततेसाठी गंभीर धोका मानले आहे.धर्म हा मुळात प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश देतो. कोणताही धर्म हिंसा शिकवत नाही. परंतु काही कट्टरवादी शक्ती धर्माचा चुकीचा अर्थ लावून लोकांना भडकवतात. त्यामुळे धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन शांतता आणि बंधुभावाचा संदेश देतील, तर समाज अधिक मजबूत होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाने सर्व धर्मांना समान आदर दिला आहे. ‘सर्वधर्मसमभाव’ ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दहशतवादविरोधी शपथ, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, रॅली आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि शांततेची भावना निर्माण होते. युवकांनी संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. युवक हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये अपार ऊर्जा आणि क्षमता आहे. ही ऊर्जा सकारात्मक दिशेने वळविणे अत्यंत आवश्यक आहे.महिलांची भूमिकाही शांतता प्रस्थापित करण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. आई, शिक्षिका, समाजकार्यकर्त्या आणि नेतृत्वकर्त्या म्हणून महिला समाजात संवेदनशीलता आणि सहकार्याची भावना निर्माण करू शकतात. अनेक महिलांनी समाजात शांतता मोहिमा राबवून सकारात्मक परिवर्तन घडवून आणले आहे. महिलांना शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग मिळाल्यास समाज अधिक स्थिर आणि प्रगत होतो.भारतीय संस्कृतीने जगाला ‘वसुधैव कुटुंबकम्’चा संदेश दिला आहे. संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, ही भावना भारतीय तत्त्वज्ञानात आढळते. प्रेम, करुणा, सहिष्णुता आणि मानवता हीच खरी संस्कृती आहे. हिंसा आणि द्वेष यातून केवळ विनाश निर्माण होतो; तर शांतता आणि सहकार्य यातून प्रगतीचा मार्ग खुला होतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजात शांतता टिकवून ठेवण्यासाठी योगदान दिले पाहिजे.दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिन हा केवळ औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही. हा दिवस आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण समाजात शांतता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी काय योगदान देत आहोत, याचा विचार या निमित्ताने करणे आवश्यक आहे. हिंसा ही समस्या सोडविण्याचा मार्ग नाही, हे समाजाने समजून घेतले पाहिजे. मतभेद असू शकतात; परंतु ते संवाद, लोकशाही आणि संविधानिक मार्गाने सोडविले पाहिजेत.आज जगासमोर शांततेचे मोठे आव्हान उभे आहे. युद्धे, धार्मिक संघर्ष, जातीय हिंसा, दहशतवाद आणि सायबर गुन्हे यांमुळे मानवता धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत जागतिक बंधुभाव, सहकार्य आणि शांततेची भावना अधिक मजबूत करण्याची गरज आहे. विविध देशांनी परस्पर सहकार्याने दहशतवादाविरोधात एकत्रित लढा दिला पाहिजे. मात्र, खरी शांतता तेव्हाच निर्माण होईल जेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये मानवतेबद्दल आदर आणि प्रेम निर्माण होईल.दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी नागरिकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींबाबत प्रशासनाला माहिती देणे, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन करणे आणि समाजात सलोखा टिकवून ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नसून समाजात शांतता, एकता आणि सद्भावना टिकवून ठेवणे होय.भारत हा शांतता, लोकशाही आणि सहिष्णुतेवर विश्वास ठेवणारा देश आहे. अनेक संकटांनंतरही भारताने लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवली आहे. हे भारतीय समाजाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. विविधतेत एकता जपणारा भारत जगासाठी आदर्श ठरू शकतो. मात्र, त्यासाठी समाजातील द्वेष, असहिष्णुता आणि हिंसक प्रवृत्ती दूर करणे आवश्यक आहे. २१ मे रोजी साजरा होणारा दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन आपल्याला शांततेचा, मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतो. या दिवशी आपण सर्वांनी हिंसेचा त्याग करून प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. शिक्षण, सामाजिक न्याय, आर्थिक विकास, नैतिक मूल्ये आणि मानवतेच्या माध्यमातूनच दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजाची निर्मिती शक्य आहे. अहिंसा, सत्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),


ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ मे २०२६


# वेशीबाहेरील आदिवासी जनजीवनाचे भळभळते दु:ख मूखर करणारा "दुष्टचक्र" : विद्रोही कवी साहेबराव मोरे




**सा**क्री येथील 'वृषाली नरेंद्र खैरनार' यांनी कथालेखनात दखलपात्र नाव निर्माण केले आहे. जामनेर येथे आयोजित साहित्य संमेलनात "खान्देशी स्त्री लेखिकांचे कथालेखनात योगदान" या परिसंवादातील सहभागाच्या अनुषंगाने अभ्यास करताना खास करून "दुष्टचक्र" कथासंग्रहाने लक्ष वेधून घेतले. वृषाली खैरनार यांनी खानदेश साहित्य विश्वात एक अमीट ठसा उमटविला आहे हे लक्षात आले. पाच वर्षात तीन आवृत्या प्रकाशित होणे ही वाचकांची पसंतीची पावती आहे. ई बुक व ई प्रिंट मिडियाच्या जमान्यात मुद्रित साहित्याला पसंती मिळणे कौतुकास्पद आहे. दुष्टचक्रच्या कथांमधील स्त्री शोषणाच्या केंद्रस्थानी राहिलेली आहे. खास करून आदिवासी स्त्रीयांची अव्यक्त, अलिखित वेदना मूखर करणारी तळमळ स्पष्ट जाणवत असते. लेखिका अंगणवाडी पर्यवेक्षिका असल्याने आदिवासी जमातीतील लोकांच्या मूलभूत प्रश्नांची जाण त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण क्षमतेतून कथानकात झिरपत असते . महिलांचे अज्ञान, लैंगिक शोषण, रूढार्थाने आलेले कालबाह्य रितीरिवाज , पुरुषांची बुरसटलेली मानसिकता , व्यसनाधीनतेतून उफाळून येणारे सांसारिक व्यवहार . कथेच्या लेखन माध्यमातूनअवतरलेले पहाडातले भीषण वास्तव वाचकाला वैचारिक मंथन करायला भाग पाडते. ही ताकद वृषाली खैरनार यांच्या लेखणीत आहे . पहाडासारसे पाझरते दु:ख, वंचितांचे उपेक्षितांचे जगणे, जगण्यातील नेमका पेच काय असतो? याचे प्रत्ययकारी संवेदन वाचक अनुभवतो हे कथासंग्रहाचे बलस्थान आहे. कथालेखक हा समाज निरिक्षक व शिक्षक असतो यांची प्रचिती दुष्टचक्रात येते आदिवासी बहुल भागातील जनजीवन,सेवा काळात आलेले दारुण अनुभव, महिलांचे अक्षम्य पिचलेपण, आदिवासींच्या 'चिंता व चिंतन' हा संग्रहाचा सामाजिक मूलाधार आहे. कथेतील पात्र, अहिराणी व भिल्ल बोली संवादांचा प्रभावी वापर, जीवंत प्रसंग, ओघवते निवेदन, मनाच्या गाभाऱ्यातील मानवी मेंदूला झिंझोडणारे प्लांट कन्स्ट्रक्शन,(कथानक ),यामुळे हा कथासंग्रह आदिवासी जमातीतील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्थितीचे उचीत दर्शन घडवितो. दुष्टचक्रात सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या आदिवासींच्या जीवन संघर्षातील दैनंदिन समस्या, हलाखीचे डोंगरच उभे असल्याचे वाचताना अनुभूती देते. एवढे प्रभावी कथाबीज रेखाटण्यात वृषाली खैरनार यशस्वी झालेल्या आहेत. संग्रहात मूलनिवासी समूहाच्या असामान्य दु:खद हुंकार प्रतिबिंबित करणा-या १९ वास्तव कथा वाचता येतील. त्यातील काही कथा लेखिकेच्या जीवनप्रवासावर बेतलेल्या आहेत. 'दुष्टचक्र' - या शीर्षक कथेतील 'फुला'ची व्यक्तीरेखा स्त्री शोषणाच्या भयावह वास्तव चित्रणामुळे मन पिळवटून टाकते. मध्यमवर्गीय शिक्षित कुटुंबाची हतबलता, असहाय्यता, परंपरेच्या ओझ्याने दबलेली मानसिक दुर्बलता "जिद्द" कथेत प्रत्ययकारी शब्दात अधोरेखित झाली आहे. ही घटना लेखिकेच्या वास्तव जीवनानुभवाची अनुभूती देऊन जाते.आदिवासी प्राबल्य असलेल्या वाडीवस्तीत नोकरी करताना कर्तव्य, शासकीय जबाबदारी व एक स्त्री म्हणून होणारी मनातील घुसमट , विशेषत: ग्रामीण भागातील महिला शोषणाचा जीवन कलहातील होणारी स्त्रीत्वाची परमोच्च दमछाक आपल्या व्यापक व संवेदनशील अनुभवाच्या जोरावर ताकदीने समाजापुढे मांडली आहे. "बांडगुळ, 'मृगया, ओंजळ, कुपोषण ह्या कथा मनाला अस्वस्थ करणा-या, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वर्षानुवर्षे कोसो दूर असलेल्या प्रगत, अप्रगत अशा दोन्ही समाजव्यवस्थेला परखड प्रश्न विचारणा-या कथा आहेत. जे पाहिले, अनुभवले, सोसले तेच शब्द शिल्प झाले. जल, जमीन, जंगलाशी सतत संघर्ष करणाऱ्या आदिवासींच्या मानव व निसर्गनिर्मित चक्रव्यूह भेदणारे 'दुष्टचक्र' हे लखलखीत हत्यार आहे. रानात जन्माला आलेल्या बाळाला कुपोषण हा एक शापच म्हणावा. कुपोषण निधी फस्त करणारी प्रशासकीय यंत्रणा, माता सक्षमीकरणाचा वांझ कळवळा या सर्वांवर मात करणारी ज्योती. तिने कुपोषणाचा तिमिर भेदण्यासाठी पेटवलेली ज्योत हा कथेचा सुखावणारा शेवट या अर्थी 'तिमिर' कथा दखलपात्र ठरली आहे. आदिवासी बोलीचा चपखल वापर हे भाषिक वैशिष्ट्य नजरेआड करता येत नाही. " कोहोवाला ऊनातो नाहा आम काय केऊ नारे"(घरवाला ऐकत नाही.आम्ही काय करु?) असे काही आदिवासी बोलीतील संवाद कथेला वास्तवाची जोड देणारे आहेत. कुपोषणावर उपाय म्हणून पोटच्या पोराला दारू पाजून भूक शमविणे. ही भीषण वास्तवता मन पिळवटून टाकणारी आहे." कुपोषण बळी रोखण्यासाठी कुठली यंत्रणा हाती घ्यावी? " हा ज्योतीला पडलेला प्रश्न शासनाच्या हेतूविषयी फोलपणा सिद्ध करतो. शिक्षणाच्या बाजारुपणावर आसूड ओढत" फंड"कथा सामाजिक भान जागृत करते. इंग्लिश मिडीयम नावे शिक्षणाचा लिलाव करणारे दलाल स्वत: ला शिक्षणमहर्षी म्हणूवन मिरवतात. हे वास्तवदर्शी कथानक डोक्यात भिनणारे आहे. या कथेतील पात्र जीवंत करणारे संवाद, पात्र संयोजन हे कथेचे बलस्थान आहे. अशा कथा समाज प्रबोधनाचे काम करीत असतात. सुखलोलूप त्रिकोणी कुटुंब व्यवस्थेच्या विचारधारेला तडा देणारी" मैत्रेयी" ही दमदार कथा आहे . जीवन साथी म्हणून घर एक घर ही भूमिका नाकारून सावित्रीबाईचा वारसा जपण्याचा आग्रह धरणारा पुरोगामी युवक रवी ! पती म्हणून आशावाद जपत भरकटलेल्या स्त्रियांना दिशादर्शक ठरतो. संसाराच्या रहाडगाड्यात होणारी "कुत्तरओढ" हृदय हेलावून सोडते. छकुली साठी तिळतिळ तुटणारी इंदू , "तून्ही पोरं काय मरी जावाऊ नहीं" तापाने फणफणत असलेल्या पोटच्या मुलींविषयी दारूड्या नव-याचे वाक्य मनात जळफळाट निर्माण करते. सरकारी दवाखान्यात कार्यरत डाॅक्टर मधील सैतान छकुलीचा बळी घेतो. आईपण पेलताना जोडीदार व कुटुंबाचा आधार नसताना एक स्त्री म्हणून विविध स्तरावर लढण्याची इंदू मनात खोलवर घर करून राहते. आशयवृद्धीसाठी अहिराणी भाषेचा वापर लेखिकेने जाणीवपूर्वक केलेला आहे. हा अनुरूप वापर वाचक समस्येला स्पर्श करणारा आहे. चित्तवेधी निवेदन शैली शेवटपर्यंत खिळवून ठेवते. संग्रहाला स्वतंत्र प्रस्तावना नाही, कमलाकर देसले यांनी कथासंग्रह वाचून पाठविलेला अभिप्राय प्रस्तावना म्हणून समाविष्ट केला आहे. कथेत कथन हे प्रयोजन असते पण सांगण्यापलिकडचे सांगणे हे मुख्य प्रयोजन असते हे तत्त्व दुष्टचक्र कथासंग्रहाला तंतोतंत लागू पडते. गाववेशी पल्याडच्या रिमोट जनजीवनाचे भळभळते दु:ख दृगोचर करणारा 'दुष्टचक्र' कथासंग्रह वाचक रसिक पसंतीच्या अग्रणी राहिला आहे तो याच अनुरोधाने. संकेत खैरनार यांनी काढलेले मुखपृष्ठ कल्पक असून कलाकारांच्या चिंतनशील प्रवृत्तीला व शीर्षकाला न्याय देणारे आहे. अथर्व पब्लिकेशन्स ने सुबक व वाचनीय तिसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे. नकारात्मकतेच्या भडीमारात सकारात्मक मूल्ये उद्धृत करणा-या समाजहितैषी लेखनासाठी वृषाली खैरनार यांना भरभरून शुभेच्छा प्रदान करतो !!



**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
**शब्द संवाद:९४०४०४८६०१**
**दुष्टचक्र : कथासंग्रह**
**-वृषाली नरेंद्र खैरनार**
**प्रकाशन :अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव**
**किंमत:₹२८०/**

# संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांचा सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** समाजकार्य आणि जनहितासाठी कार्यरत असलेले जेष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार या समाज सेवकाला राज्यस्तरीय आदर्श रत्न पुरस्काराने नुकतेच पुणे येथे गौरविण्यात आले त्याबद्दल माजी मंत्री आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. नांदेड नगरीत वासवी अर्बन उदघाट्न कार्यक्रमात उपस्थित प पु हभप एकनाथ महाराज साधू महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई, दिलीपभाऊ कंदकुर्ते, एकनाथराव मामडे, अनिल मनाठकर, सदानंद मेडेवार, राजूभाऊ मुक्कावार, दिपक निलावार, विजय कुंचनवार, नरेंद्र येरावार, शंतनु कोटगिरे , अनिल मुगटकर, भागवत लोकमनवार, गजानन चिद्रेवार, प्रणव मनूरवार, लक्ष्मीकांत मुक्कावार, प्रभाकर पत्तेवार, रविंद्र बंडेवार, बिपीन गादेवार, संजय काचावार, राजू मोतेवार यांच्यासह अनेक मान्यवर, महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.